12 JUL 2021
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आजपासून ऑनलाईन युवा महोत्सव

## कोल्हापूरसह सांगली, सातारा येथे एकाच वेळी रंगणार कला सादरीकरण

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागातर्फे ४० वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव सोमवार, दि. १२ जुलै रोजी होत आहे. जिल्हास्तरीय युवा महोत्सवचे संयोजकपद यंदा न्यू कॉलेजला मिळाले आहे. तीन दिवसीय जिल्हास्तरीय महोत्सव आहे. कोल्हापूरसह सांगली आणि सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सव एकाच वेळी म्हणजे १२ ते १४ जुलै दरम्यान होणार आहेत. यंदा तीनही जिल्ह्यांतील युवा महोत्सव ऑनलाईन होणार आहेत. उद्घाटनापासून कला सादरीकरणापर्यंत हा महोत्सव ऑनलाईन असणार आहे.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे अध्यक्ष के. जी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी सकाळी नऊ वाजता महोत्सवाचे उद्घाटन होईल. प्र-कुलगुरू पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती आहे. संयोजन समितीचे अध्यक्ष व कॉलेजचे प्राचार्य व्ही. एम. पाटील, विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक आर. व्ही. गुरव, कोल्हापूर जिल्हा विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक डी. व्ही. चिघळीकर, न्यू कॉलेजचे उपप्राचार्य ए. एम. शेख यांची उपस्थिती असणार आहे. उद्घाटन ऑनलाइन पद्धतीने होणार आहे.

दरम्यान, सोमवारी (दि. १२) रांगोळी, मराठी व हिंदी वक्तृत्व स्पर्धा, शास्त्रीय गायन व शास्त्रीय नृत्य, व्यंगचित्र, सूरवाद्य हे कलाप्रकार होतील. मंगळवारी (दि. १३) भित्तीचित्र, एकपात्री अभिनय, सुगम गायन, पाश्चिमात्य वादन, कातरकाम, मेहंदी कलाप्रकारातील स्पर्धा होतील. बुधवारी (दि. १४) इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा, शास्त्रीय तालवाद्य, मातीकाम, पाश्चिमात्य एकल गायन, नकला, स्थल चित्रण या कलाप्रकारातील स्पर्धा होतील.

### मध्यवर्ती युवा महोत्सव १५ पासून

या युवा महोत्सवासाठी कोल्हापूरचे संयोजकपद न्यू कॉलेजकडे, सांगली जिल्ह्याचे संयोजकपद श्रीमती मालती वसंतदादा पाटील महाविद्यालय इस्लामपूर, तर सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे संयोजकपद बाळासाहेब देसाई महाविद्यालय फलटणकडे आहे. दि. १५ ते १७ जुलै दरम्यान विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव होत आहे. मध्यवर्ती युवा महोत्सवाचे संयोजकपद कराड येथील वेणुताई चव्हाण महाविद्यालयाकडे आहे. पारितोषिक वितरण समारंभ नंतर होणार आहे.

- डॉ. आर. व्ही. गुरव,
संचालक, विद्यार्थी विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUL 2021
तरूण भारत

# ऑनलाईन युवा महोत्सवाचे आज उद्घाटन

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख पाहुणे
- प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची उपस्थिती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली जिल्ह्याच्या जिल्हास्तरीय ऑनलाईन युवा महोत्सव १२, १३ आणि १४ जुलै असे तीन दिवस होणार आहे. आज (दि. १२) रोजी सकाळी ९ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. हा महोत्सव न्यू कॉलेज कोल्हापूर, सांगलीतील इस्लामपूर येथील मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, सातारा जिल्ह्यातील पाटण येथील बाळासाहेब देसाई कॉलेज येथे होणार आहे.

या युवा महोत्सवामध्ये रांगोळी, वक्तृत्व, शास्त्रीय गायन, व्यंगचित्र, शास्त्रीय सुरवाद्य भित्तीचित्र, शास्त्रीय नृत्य, सुगम गायन, कातरकाम, एकपात्री अभिनय, मेहंदी, पाश्चिमात्य वाद्य वादन, मातीकाम, एकल गायन, नकला आदी स्पर्धा होणार आहेत. कोल्हापुरातील न्यू कॉलेजमध्ये होणाऱ्या युवा महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील आहेत. विविध १९ कलाप्रकारात सुमारे ४५० हून अधिक विद्यार्थी सहभाग नोंदवणार आहेत. विद्यार्थ्यांना संबंधीत कला प्रकाराचे सादरीकरण लॅपटॉप व मोबाईलच्या माध्यमातून ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्या लागणार आहेत.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUL 2021
तरुण भारत

# डॉ. मोहोळकर यांना आंतरराष्ट्रीय रिसर्च एक्सलन्स पुरस्कार

## मटेरियल सायन्स क्षेत्रातील संशोधनाची जगभरात दखल

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागातील संशोधक डॉ. आण्णासाहेब मोहोळकर यांची 'इंटरनॅशनल रिसर्च व सायन्स, हेल्थ अँड इंजिनीरिंग' अर्थात 'सायन्स फादर" संस्थेच्या 'आंतरराष्ट्रीय रिसर्च एक्सलन्स' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. सायन्स फादर ही संस्था दरवर्षी विज्ञान शाखेत उत्तम कामगिरी करणाऱ्या संशोधकांचा विविध पुरस्कार देवून गौरव करते. डॉ. मोहोळकर यांनी मटेरियल सायन्स क्षेत्रात केलेल्या संशोधनाची दखल जागतिक स्तरावर घेण्यात आली आहे.



डॉ. मोहोळकर यांना गतवर्षी अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने घेतलेल्या सर्वेक्षणात जागतिक क्रमवारीत टॉप २ टक्के शास्त्रज्ञांच्या यादीमध्ये स्थान मिळाले होते. तसेच यावर्षी 'एडी सायंटिफिक' या संस्थेच्या सर्वेक्षणात देखील जागतिक शास्त्रज्ञांच्या यादीत त्यांना स्थान लाभले आहे. त्यांना 'व्हिनस इंटरनॅशनल" संस्थेमार्फत या वर्षीचा 'मटेरियल सायन्स विशेषज्ञ' पुरस्कारही जाहीर झाला आहे. डॉ. मोहोळकर यांनी विविध विषयांवर पेटंट मिळवली आहेत. शिवाजी विद्यापीठातून पीएच. डी. पदवी घेतल्यानंतर दक्षिण कोरियातून पोस्ट डॉक्टरेट केले. २००९ साली बॉईजकास्ट फेलो म्हणून भारतातून ७२, तर महाराष्ट्रातून दोघांची निवड केली होती. त्यापैकी ते एक आहेत. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर १७५ हून अधिक शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत. त्यांच्या संशोधनाचा संदर्भ सूची म्हणून जगभरातून ६८०० हून अधिक संशोधकांनी आधार घेतला आहे. सध्या ते काही आघाडीच्या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांचे संपादक व रिव्ह्यूअर म्हणून काम पाहतात. त्यांनी दीड कोटी रुपयांचे आठ मोठे संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. विद्यार्थ्यांच्या अंगी संशोधन अभिवृत्ती निर्माण व्हावी व समाजातील प्रश्न घेऊन संशोधनाच्या माध्यमातून ते सोडविण्यासाठी डॉ. मोहोळकर पुढाकार घेतात. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना परदेशांत पोस्ट डॉक्टरेट करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUL 2021

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ ऑनलाईन युवा महोत्सव आजपासून

## न्यू कॉलेजमध्ये कोल्हापूरचा महोत्सव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ४० व्या ऑनलाईन जिल्हास्तरीय युवा महोत्सवास १२ जुलैपासून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात सुरुवात होणार आहे.

विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाने यावर्षीच्या जिल्हा व मध्यवर्ती ऑनलाईन युवा महोत्सवाच्या तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार १२, १३ व १४ जुलै रोजी न्यू कॉलेज कोल्हापूर, मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय इस्लामपूर सांगली, बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण यांच्यामार्फत जिल्हास्तरीय युवा महोत्सव घेतला जाणार आहे. युवा महोत्सवात ९०० हून कलाकार सहभागी होणार आहेत. वक्तृत्व स्पर्धा, सुगम गायन, शास्त्रीय गायन, पाश्चिमात्य एकलगायन, नकला, एकपात्री, व्यंगचित्र, कातरकाम, मातीकाम, रांगोळी, मेहंदी आदी कला प्रकारांचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हास्तरीय युवा महोत्सव न्यू कॉलेज येथे होणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन सकाळी ९ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील असणार आहेत. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. आर. व्ही. गुरव यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. विविध १९ कलाप्रकारांमध्ये सुमारे ४५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत. कला प्रकारांचे सादरीकरण घरातून मोबाईल व लॅपटॉपच्या माध्यमातून कलाकार करणार आहेत, अशी माहिती न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी दिली.

12 JUL 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशासाठी दर्जेदार कौशल्ये प्राप्त करा

## डॉ. ए. एम. गुरव : राजर्षी शाहू कॉलेजमध्ये प्रमाणपत्र वितरण

सकाळ वृत्तसेवा

कदमवाडी, ता. ११ : आजच्या गतिमान काळात शिक्षण, व्यापार, उद्योग, कृषी अशा प्रत्येक क्षेत्रात झपाट्याने बदल घडत आहेत. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबर दर्जेदार कौशल्ये प्राप्त करून त्यांचा सतत विकास केला, तरच तुम्ही ध्येयाप्रत जाऊन उज्ज्वल यश प्राप्त कराल, असे मत शिवाजी विद्यापीठातील कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी व्यक्त केले. ते राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयात बॉश ब्रिज कोर्सच्या प्रमाणपत्र वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे म्हणाले, "महाविद्यालयातील इंग्रजी विभागाने रयत शिक्षण संस्थेच्या धोरणानुसार योग्य नियोजन करून बॉश ब्रीज कोर्सचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. हा कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना विविध कार्पोरेट सेक्टरमध्ये काम करण्याची संधी मिळेल."



कदमवाडी : येथील राजर्षी शाहू कॉलेजमध्ये बॉश ब्रीज कोर्सच्या प्रमाणपत्र वितरण सोहळ्यात बोलताना डॉ. ए. एम. गुरव. शेजारी अन्य मान्यवर.

महाविद्यालय विकास समितीचे सदस्य विक्रांत पाटील यांनी विद्यार्थ्यांनी चाकोरीबद्ध पारंपरिक शिक्षण पद्धतीत अडकून न पडता स्वत:मधील क्षमता ओळखून विविध कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन केले. इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. एस. एम. साठे, कनिष्ठ विभाग उपप्राचार्या नंदिनी साळुंखे आदी उपस्थित होते.

बॉश ब्रिज कोर्स समन्वयक डॉ. सविहा फरास यांनी प्रास्ताविक केले. यावेळी ईश्वरी कुंचकोरवी, करीना सनदे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. एस. एम. पाटील यांचा सत्कार झाला. सूत्रसंचालन 'यिन' प्रतिनिधी मानसी कुंचकोरव, रविराज कांबळे यांनी केले.